# निशाणी ११ वरील आदेश

**CNR-MHAH21000290-2020**

**१.** प्रस्तुतचा अर्ज यातील वादी यांनी दाव्यातील विनंती कलमामध्ये दुरूस्ती होवुन मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रूल १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथनानुसार, वादी यांनी मुळ दाव्याच्याकामी प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या अपरोक्ष ती स्वत: एकमेव वारस असल्याचे भासवुन न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र मिळवले असून त्या आधारे प्रतिवादी क्र. १ दावा मिळकतीचे हस्तांतरण करण्याच्या विचारात असल्याचे कथन करून दावा वाद मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यासाठी तसेच निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनामध्ये वादीने आपली वाटपासंबंधीची मागणी ठिकठिकाणी नमूद केली असून दाव्याच्या आकारणीमध्ये देखील वाटपाकरीता आवश्यक तो कोर्ट फि स्टॅम्प जोडला असल्याचे नमूद केलेले आहे. मात्र नजर चुकीने मुळ दाव्याचे विनंती कलमामध्ये वाटपाबाबतची मागणी नमूद करणे राहुन गेले आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार, मुळ दाव्याच्या कामी वाटपाबाबतची मागणी समाविष्ट करण्यात न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असून सदरची दुरूस्ती तांत्रीक स्वरूपाची असल्याने दाव्याच्या स्वरूपात बदल होणार नाही. याउलट दुरूस्ती नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतच्या दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या वाटपाबाबत ठिकठिकाणी मागणी करून दावाच्या आकारणीमध्ये देखील वाटपाबाबत आवश्यक तो कोर्ट फि स्टॅम्प दिल्याचे नमूद केलेले आहे. सदरकामी अद्याप प्रतिवादी यांना नोटीसची बजावणी झालेली नाही. वादीने मागितलेली दुरूस्ती दाव्याचे अवलोकन केले असता तांत्रीक स्वरूपाची असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरची दुरूस्ती करणेस वादीस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नसून अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: <u>आ दे श</u> :-**

**१.** वादींचा नि. ११ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी प्रस्तावित दुरूस्ती मुळ दाव्याचे कामी ताबडतोब करून तशी दुरूस्त दावा प्रत त्वरीत याकामी दाखल करावी.

**३.** दावा दुरूस्ती प्रत दाखल केल्यानंतर सर्व प्रतिवादी यांना पुन्हा दुरूस्ती दाव्याबाबत नोटीस काढण्यात यावी व त्याबाबतची आवश्यक ती पुर्तता वादीने करावी.

**४.** खर्चा बाबत आदेश नाही.

दि. २७/०२/२०२०

(श्री. पी.व्ही. सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश, 'क' स्तर, जामखेड.